नियमित फौजदारी केस क्र.१४९/२०१४
निशाणी क्र.२१

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ याची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | संजय बाळकृष्ण शेठ |
| वय | – | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | – | किराणा माल व्यापारी |
| राहणार | – | जुनी पेठ, बाजारपेठ महाड, ता. महाड, जि. रायगड. |

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रकाश जोशी यांच्याकडून</u>**

माझे जुनी पेठ, बाजारपेठ महाड येथे महालक्ष्मी एजन्सी या नावाचे किराणा माल विक्रीचे दुकान आहे. सुभाष शहा व त्यांच्या घरातील लोकांना मी ओळखतो. दिनांक १७/०२/२०१० रोजी पोलीस माझ्याकडे आले होते. त्यावेळी मी बॉण्ड पेपरवर सही केली होती. सदरचा बॉण्ड पेपर संजीव सुभाष शहा व जगदीश मुखीया यांच्यामध्ये झालेला होता. सदरचा बॉण्ड पेपर हा संजीव सुभाष शहा व जगदीश मुखीया यांच्यामध्ये शेअर्सच्या व्यवहाराबाबत झालेला होता. सदर बॉण्डमध्ये जगदीश मुखीया संजीव शहा यांना शेअर्स विक्री व्यवहारापोटी रक्कम रुपये ९,३५,०००/– देणे होता असे लिहीलेले होते. जगदीश मुखीया हा फिर्यादीचे डीमॅट व्यवहाराचे काम करीत होता. वर नमुद बॉण्ड पेपरवर माझी साक्षीदार म्हणुन सही आहे. सदरचा बॉण्ड माझ्यासमक्ष झालेला होता.

**(सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी मुळ बॉण्ड पेपर उपलब्ध नसल्याने उर्वरित सरतपास घेण्यास पुढील तारखेपर्यंत तोंडी मुदत मागितली. मुदत देण्यात आली).**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

SHAIKH BABASO S PATIL
Digitally signed by SHAIKH BABASO S PATIL
Date: 2023.03.06 11:42:39 +0530

(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक ०४/०३/२०२३